| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHPA100007122025 | खटला दाखल दिनांक | : | ०७/११/२०२५ | | |
| | खटला नोंदणी दिनांक | : | ०७/११/२०२५ | | |
| | खटला निकाल दिनांक | : | ०८/०७/२०२६ | | |
| | निकाल कालावधी | : | ०० | ०८ | ०१ |
| | | | वर्षे | महिने | दिवस |

**भाग 'अ'**

## अतिरिक्त सत्र न्यायाधीश, गंगाखेड यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी जी.पी.बावस्कार)**

**सत्र खटला क्रमांकः ७०/२०२५** **नि.क्र :**

**(पोलीस ठाणे– पालम येथील गुन्हा नोंद क्र. १५३/२०२१,**
**भारतीय दंड संहिताचे कलम ३२८, १८८, २७२, २७३ प्रमाणे)**

| | | |
|---|---|---|
| सरकार पक्ष/फिर्यादी | – | महाराष्ट्र शासन द्वारा,<br>पोलीस ठाणे, पालम,<br>ता. पालम, जिल्हा परभणी. |
| सादरकर्ते | – | सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.डी वाकोडकर |
| विरुध्द | | |
| आरोपी | – | शेख अब्दुल रशिद पि. शेख आयुब साब<br>वय– ५६ वर्षे, व्यवसाय– मजुरी<br>रा. ताडकळस, ता. पुर्णा, जि परभणी |
| सादरकर्ते | – | आरोपीतर्फे वकिल श्री जे.ए.दिगे |

## भाग 'ब'

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | ०७/०७/२०२१ |
| फिर्याद दाखल तारीख | : | ०७/०७/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | २५/०५/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | : | १२/११/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | १६/०२/२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | : | ०८/०७/२०२६ |
| निकालाची तारीख | : | ०८/०७/२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेलतर. | : | -- |

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्र.संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | शेख अब्दुल रशिद पि शेख आयुब साब | ०७.०७.२०२१ | १५.०७.२०२१ | भारतीय दंड विधानाचे कलम ३२८, २७२, २७३ व १८८ अन्वये | निर्दोष मुक्त. | -- | -- |

## भाग 'क'

### 'अ' सरकारपक्षाचे साक्षीदार

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र-१ | शेख कादर शेख खाजामिया | जप्ती पंच (नि.क्र.१६) |
| सा.क्र-२ | गंगाधर देवराव शिंदे | जप्ती पंच (नि.क्र.१७) |
| सा.क्र-३ | कल्याण रामभाउ साठे | फिर्यादी (नि.क्र.२२) |

### 'ब' - बचाव पक्षाचे साक्षीदार

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| बचाव पक्षाचे सा.क्र–१ | तपासले नाही. | –– |

## 'क' – न्यायालयाचे साक्षीदार

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| कोर्ट सा.क्र–१ | तपासले नाही. | –– |

## 'अ' सरकारपक्षाचा कागदोपत्री पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी–पी.२३/सा.क्र.३ | जप्ती पंचनामा |
| २ | निशाणी–पी.२४/सा.क्र.३ | फिर्याद |

## 'ब' – बचाव पक्षाचा कागदोपत्री पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | –– |

## 'क' – न्यायालयाचा कागदोपत्री पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | –– |

## 'ड' – मुद्देमाल/वस्तू

| अ.क्र | मुद्देमाल/वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | -- |

## -::- न्यायनिर्णय -::-

( आज दिनांक ०८ जुलै, २०२६ रोजी अधिघोषीत )

१) आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ३२८, २७२, २७३ व १८८ चे गुन्ह्यासाठी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

### अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे :-

२) पोलीस नाईक कल्याण रामभाउ साठे हे पोलीस ठाणे पालम येथे कार्यरत असताना, दिनांक ०७/०७/२०२१ रोजी ते रात्री २०.०१ वाजता नाकाबंदी करत असतांना पालम शहरात गस्त करत पेठपिंपळगावचौक, पालम येथे अंदाजे २०.२० वाजता त्यांना एक इसम मोटरसायकलवर काळ्या रंगाच्या बॅग मध्ये पांढ-या रंगाचे पोते घेवून येतांना दिसल्यामुळे त्यांनी त्याला थांबविले. त्याचे जवळील पोत्याची झडती घेतली असता तो महाराष्ट्र शासनाने बंदी असलेल्या गुटख्याची चोरटी वाहतुन करतांना आढळून आला. त्यानंतर दोन पंचांना बोलावण्यात आले. पोत्यात आढळून आलेला व महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला ०५ प्रकारचा गुटखा, पानमसाला व तंबाखु एकुण किंमत ₹.३१,१२६/- चा ऐवज मिळुन आला. सदर मुद्देमालातुन तपासणीकामी नमुना वेगळा काढण्यात आला व उर्वरित मुद्देमाल पंचनामा करुन पंचांसमक्ष जप्त करण्यात आला. आरोपी व मुद्देमाल पोलीस ठाण्यात आणल्यानंतर फिर्यादी पोलीस नाईक साठे यांनी आरोपी विरूध्द तक्रार नोंदवली.

३) अशा तक्रारीवरुन पोलीस ठाणे पालम येथे आरोपीविरुध्द गुन्हा क्र. १५३/२०२१ भा.दं.वि. कलम ३२८, १८८, २७२ व २७३ नुसार गुन्हा कायम करण्यात आला. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साने यांच्याकडे गुन्ह्याचे मुळ कागदपत्र व

मुद्देमालासह देण्यात आला. तपास अधिकाऱ्याने पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. आरोपीस गुन्ह्याकामी अटक केली. साक्षीदारांची बयाणे त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविली. जप्त मुद्देमाल नमुना अन्न विश्लेषक यांचेकडे तपासणीकामी पाठविण्यात आला व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले.

४) प्रस्तुत खटल्यात भारतीय दंड विधानाचे कलम ३२८ नुसार गुन्हा झाल्याचे दिसुन येत असल्याचे निरीक्षण नोंदवुन व सदर गुन्ह्याचा खटला चालविण्याचे अधिकार सत्र न्यायालयास असल्यामुळे प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, पालम यांनी सदर खटला सत्र न्यायालयाकडे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २०७ अन्वये पुर्तता करुन वर्ग केला.

५) आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक १० प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ३२८, २७२, २७३ व १८८ अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आला. तो दोषारोप आरोपीस त्याचे भाषेत वाचुन व समजावुन सांगण्यात आला. आरोपीने दोषारोप नाकबुल केला व खटला चालविण्याची विनंती केली. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब निशाणी क्रमांक २९ नोंदविण्यात आला. आरोपीने बचाव घेतला की, त्याने कोणत्याही प्रकारचा गुन्हा केलेला नाही.

६) सरकार पक्षाचे कथन व आरोपीचा बचाव पाहता खालीलप्रमाणे मुद्दे हे विचाराधीन असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ०७/०७/२०२१ रोजी २०.२० वाजताचे दरम्यान, पेठपिंपळगावचौक, पालम, ता. पालम, जि. परभणी येथे आरोपीने त्याचे ताब्यामध्ये प्रतिबंधित अन्नपदार्थ अपराध करण्याचे उद्देशाने वा अपराध करणे सुकर व्हावे या उद्देशाने व त्यामुळे दुसऱ्याचे दुखापतीस कारण होण्याची शक्यता आहे याची जाणीव असतांना ते विक्री करण्याचे उद्देशाने स्वत:चे | .... नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | कब्जात बाळगले व भारतीय दंड विधानाचे कलम ३२८ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ? | |
| २) | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी, आरोपीकडे प्रतिबंधित अन्नपदार्थ मिळून आले, जेणेकरून ते अन्न म्हणून अपायकारक (Noxious) व्हावे आणि अशा वस्तू खाद्यपदार्थ म्हणून विकण्याच्या उद्देशाने आरोपीने त्याचे कब्जात बाळगुन भारतीय दंड संहितेच्या कलम २७२ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ? | .... नकारार्थी. |
| ३) | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने प्रतिबंधित अन्नपदार्थ विक्रीसाठी देऊ केले किंवा विक्रीसाठी मांडले, जे अन्न म्हणून अपायकारक (Noxious) झाले होते; हे पदार्थ अन्न म्हणून अपायकारक आहेत हे माहित असताना किंवा तसे मानण्यास पुरेसे कारण असताना देखील आरोपीने ते विक्रीसाठी उपलब्ध करून दिले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम २७३ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे ? | .... नकारार्थी. |
| ४) | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद केलेल्या तारखेस, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने प्रतिबंधित अन्नपदार्थ उत्पादित करणे साठवणे वा विक्री करणेबाबत लोकसेवकाने रितसर आदेश जारी केलेला असतांना सुध्दा त्याचे कब्जात प्रतिबंधित अन्नपदार्थ बाळगले व लोकसेवकाचे आदेशाची अवज्ञा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे ? | ... नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ५) | आदेश काय? | अंतिम आदेशानुसार. |

## -::- <u>का र ण मि मां सा</u> -::-

**<u>मुद्दे क्रमांक – १ ते ५</u>**

७) दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाने उपरोक्त भाग 'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण तीन साक्षीदार तपासले आहेत. आरोपीने स्वत:चा वा इतर साक्षीदारांचा पुरावा दिलेला नाही.

८) सरकारी वकीलांनी असा युक्तिवाद केला की, साक्षीदार क्र.३ हे गस्तीच्या कर्तव्यावर असतांना त्यांनी आरोपीची मोटर सायकल अडवून त्याची झडती घेतली असतांना आरोपीचे कब्जातुन गुटखा व पानमसाला पंचनाम्यानुसार जप्त करण्यात आला होता. असा सुध्दा युक्तीवाद करण्यात आला की, सा.क्र.१ व सा.क्र.२ हे जरी फितुर झाले असले तरी जप्ती पंचनामा व फिर्याद ही सा.क्र.३ कल्याण याने सिध्द केलेली आहे. युक्तीवाद करण्यात आला की आरोपीस दोषी धरण्यात यावे व शिक्षा ठोठावण्यात यावी.

९) याउलट आरोपीचे वकीलांनी युक्तीवाद केला की, जप्ती पंचनाम्यावरील पंच सा.क्र.१ व सा.क्र.२ हे फितुर झाले त्यामुळे योग्यरित्या जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. तसेच या प्रकरणात घटनास्थळ पंचनामावरील पंच तपासले नसल्यामुळे तो सिध्द होउ शकला नाही. अभियोगपक्ष तपास अधिकारी यांना तपासण्यात अपयशी ठरल्यामुळे या प्रकरणात काय तपास झाला व आरोपी विरुध्द कोणत्या पुराव्या आधारे दोषारोप दाखल झाले हे अभिलेखावर आलेले नाही. असा सुध्दा युक्तीवाद करण्यात आला की, पोलीसांचे तोंडी साक्ष जबानीव्यतिरिक्त अन्न विश्लेषकाचा अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही, ज्यायोगे असे सिध्द होईल की, जप्त मुद्देमाल हा मानवास अपायकारक होता वा त्यामध्ये विष होते. युक्तीवाद करण्यात आला की, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात यावे.

१०) जप्ती पंचनाम्यावरील पंच सा.क्र.१ शेख कादर व सा.क्र.२ गंगाधर दोघांनीही पुराव्यात सांगितले की, पोलीसांनी त्याचेसमक्ष आरोपीकडुन गुटखा जप्त केला नाही तसेच पंचनाम्यातील मजकुर त्यांना माहित नाही. पोलीसांनी त्यांची सहि घेतली होती. सदरील दोन्ही साक्षीदार हे फितुर झाले व त्यांनी अभियोगपक्षाच्या कथनास सर तपास अथवा त्यांच्या उलट तपासात काहीही मदत केली नाही.

११) सा.क्र.३ पोलीस नाईक कल्याण साठे यांनी पुराव्यात सांगितले की, ते व इतर पोलीस कर्मचारी गस्तीवर असतांना त्यांनी आरोपीच्या ताब्यातुन प्रतिबंधित गुटखा व पानमसाला किंमत ₹३१,१२६/– चा मुद्देमाल जप्त करण्यात आला व त्या मुद्देमालातुन नमुना विश्लेषणासाठी वेगळा काढण्यात आला. व त्यानंतर त्यांनी मुद्देमाल व आरोपी पोलीस ठाण्यात आणल्यानंतर फिर्याद निशाणी क्र.२४ नोंदविण्यात आली होती. उलट तपासात त्यांनी कबुल केले की, घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण होते व आजुबाजूला मेडीकल व इतर दुकाने होती. त्यांना मोटरसायकल चा नंबर उलट तपासात सांगता आला नाही.

१२) अशा प्रकारे अभिलेखावर फक्त पोलीस हवालदार साठे सा.क्र.३ यांच्या पुराव्या व्यतिरीक्त इतर साक्षीदाराची साक्ष आलेली नाही. तपास अधिका–याने कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराचे बयान सुध्दा नोंदविले नाही. अभियोग पक्षाच्या कथना नुसार आरोपीच्या ताब्यातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला अथवा तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले परंतु सदरचा मुद्देमाल गुटखा होता व तो मानवास अपायकारक होता वा त्यात विष अथवा मुचर्छा कारक पदार्थ होता हे सिध्द झालेले नाही. सदरची बाब सिध्द करण्यासाठी फिर्यादीचे तोंडी पुराव्या व्यतिरीक्त इतर कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही वा न्याय वैद्यकीय प्रयोगशाळेचा अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. तसेच मुद्देमाल तपासणीसाठी पाठवलेचे पत्र देखील सिध्द केलेले नाही. अभिलेखावर असा कोणताही परिस्थितीजन्य पुरावा आलेला नाही की, ज्यायोगे आरोपीने गुन्हा केल्याचे सिध्द होऊ शकेल. सरकार पक्षाचे असेही कथन नाही की, आरोपीने सदरचा अन्न पदार्थ इतरांना खायला दिला वा

या पदार्थामुळे इतरांना इजा झाली वा तशी लक्षणे इतरांना होती. आरोपीने सदरच्या अन्न पदार्थात भेसळ केली होती वा त्यास भेसळीची माहिती होती वा तो अन्न पदार्थ हानिकारक होता असेही अभिलेखावर आलेले नाही. साक्षीदारांनी जरी सांगितले की, विश्लेषणासाठी त्या अन्न पदार्थातुन नमुना देण्यात आला, परंतु असा तज्ञाचा अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही वा त्या अहवालाची प्रत आरोपीला सुध्दा देण्यात आलेली नाही.

१३) आरोपीविरुध्द भा.दं.वि कलम १८८ नुसार शिक्षापात्र गुन्ह्याचा दोषारोप सुध्दा ठेवण्यात आलेला आहे. परंतु, या गुन्ह्याची तक्रार संबंधित अधिकाऱ्याने फौ.प्र.सं. कलम १९५ (१)(क) नुसार दाखल केलेली नाही. त्यामुळे आरोपीस या दोषारोपाखाली सुध्दा दोषी धरता येणार नाही.

१४) अशा प्रकारे अभिलेखावर आलेला पुरावा, आरोपीने त्याचे कब्जात गुटखा, पान मसाला वा तंबाखु बाळगली तसेच जप्त नमुन्यात विष इत्यादीच्या सहाय्याने इतरांना दुखापत पोहोचविण्याचा आरोपीचा हेतु होता व सदर अन्नपदार्थ अपायकारक होते हे सिध्द करण्यास पुरेसा नाही. सबब, मुद्दे क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत व मुद्दा क्र.५ चे उत्तराकरीता पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## -::- आदेश -::-

१) आरोपी शेख अब्दुल रशिद पि शेख आयुब साब रा. ताडकळस, ता. पुर्णा, जि परभणी यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ३२८, २७२, २७३ व १८८ अन्वयेच्या आरोपातुन निर्दोष सोडण्यात येते.

२) जप्त मुद्देमाल व नमुना उपलब्ध असल्यास योग्य विल्हेवाटीकरीता अन्न निरीक्षक, परभणी यांना अपील कालावधीनंतर पाठविण्यात यावा.

३) आरोपीचा जातमुचलका रद्द करण्यात येतो.

४) जप्त करण्यात आलेले वाहन बजाज सी टी १०० आरटीओ क्र.एम एच २१/एच–२३७२ ही नोंदणीकृत मुळ मालकास परत केली नसल्यास योग्य त्या मालकीची कागदपत्रे तपासुन नियमानुसार अपील कालावधीनंतर मुळ मालकास परत करावी.

५) आरोपीने कलम ४८१ भारतीय न्याय सुरक्षा संहिता प्रमाणे या निकाला विरुध्द अपिल किंवा प्रकरणाशी संबधी वरिष्ठ न्यायालयाची नोटीस आल्यानंतर तेथे हजर राहण्यासाठी ₹ १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व त्याच रकमेची ऐपत असलेला जामीनदार द्यावा.

GOPAL PANDHARI BAWASKAR
Digitally signed by GOPAL PANDHARI BAWASKAR
Date: 2026.07.08 15:40:01 +0530

**(जी.पी.बावस्कार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश,**
**गंगाखेड.**

**दिनांकः ०८/०७/२०२६**